**वादीचा पुढील सरतपास शपथेवर सुरू –**

०३. मी अभिलेखावर राहाता नगरपरिषद यांच्याकडुन दिनांक ०६.१०.२०२० रोजी आमच्या भागीदारी फर्मला राहाता शहराच्या विकास आराखडयाबाबतचे कामावर देखरेख करण्याबाबतचे पत्र आले होते, त्याची मला प्राप्त झालेली प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.२९** देण्यात येते.

०४. मी अभिलेखावर राहाता नगरपरिषद यांच्याकडुन दिनांक ३०.११.२०१७ रोजी आमच्या भागीदारी फर्मला राहाता शहराच्या विकास आराखडयाबाबतचे कामाचे दुसऱ्या टप्प्याच्या रस्ते विकास कामाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल बनवुन देण्याबाबत पत्र प्राप्त झाले होते, त्याची आमच्या भागीदारी फर्मला प्राप्त झालेली प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.३०** देण्यात येते.

०५. आमच्या भागीदारी फर्म मार्फत मुख्याधिकारी नगरपरिषद, राहाता यांना राहाता नगरपरिषद हद्दीमधील रस्ते प्रकल्पाचा अहवाल दिनांक ०३.०५.२०१८ रोजीच्या पत्राअन्वये सादर केला होता व त्यावर संबंधीत कार्यालयाच्या लिपीकाची पत्र प्राप्त झाल्याबाबत सही आहे. सदर प्रतीस **नि.क्र.३१** देण्यात येते.

०६. आमच्या भागीदारी फर्म मार्फत मुख्याधिकारी नगरपरिषद, राहाता यांना राहाता नगरपरिषद हद्दीमधील रस्ते प्रकल्पाचा अहवाल दिनांक ०३.०५.२०१८ रोजीच्या पत्राअन्वये सादर केला होता आणि त्याच दिवशी त्या कामाचे अनुषंगाने देय होणाऱ्या देयकाचा तपशिल सादर केला होता व त्या रकमेची मागणी केली होती. सदर पत्रावर संबंधीत कार्यालयाच्या लिपीकाची पत्र प्राप्त झाल्याबाबत सही आहे. सदर प्रतीस **नि.क्र.३२** देण्यात येते.

०७. आमच्या भागीदारी फर्मला मुख्याधिकारी यांच्याकडील सुचनेअनुसार राहाता नगरपरिषद हद्दीमधील रस्ते प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यामधील १५ रस्त्यांपैकी ५ रस्ते वगळता उर्वरित रस्त्याचे नव्याने प्रकल्प अहवाल सादर करण्याविषयी सांगण्यात आले होते. त्याअनुसार तो अहवाल दिनांक ०६.०८.२०१८ रोजीच्या पत्राअन्वये सादर केला होता व त्यावर संबंधीत कार्यालयाच्या लिपीकाची पत्र प्राप्त झाल्याबाबत सही आहे.

सदर प्रतीस **नि.क्र.३३** देण्यात येते.

०८. आमच्या भागीदारी फर्म मार्फत मुख्याधिकारी नगरपरिषद, राहाता यांना राहाता नगरपरिषद हद्दीमधील रस्ते प्रकल्पाचा नव्याने करण्यात आलेला अहवाल दिनांक ०६.०८.२०१८ रोजीच्या पत्राअन्वये सादर केला होता आणि त्याच दिवशी त्या कामाचे अनुषंगाने देय होणाऱ्या देयकाचा तपशिल सादर केला होता व त्या रकमेची मागणी केली होती. सदर पत्रावर संबंधीत कार्यालयाच्या लिपीकाची पत्र प्राप्त झाल्याबाबत सही आहे. सदर प्रतीस **नि.क्र.३४** देण्यात येते.

०९. आमच्या भागीदारी फर्म मार्फत मुख्याधिकारी नगरपरिषद, राहाता यांना राहाता नगरपरिषद हद्दीमधील रस्ते प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्यातील सुधारीत अहवाल सादर केला होता व त्या अनुषंगाने सुधारीत अहवालाच्या कामाची देयकाची रक्कम अदा करण्याबाबत दिनांक ३१.०८.२०१८ रोजी देयकाच्या तपशिलासह पत्र सादर केले होते व त्या रकमेची मागणी केली होती. सदर पत्रावर संबंधीत कार्यालयाच्या लिपीकाची पत्र प्राप्त झाल्याबाबत सही आहे. सदर प्रतीस **नि.क्र.३५** देण्यात येते.

१०. आमच्या भागीदारी फर्म मार्फत मुख्याधिकारी नगरपरिषद, राहाता यांना राहाता नगरपरिषद हद्दीमधील रस्ते प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्यातील प्रचलित शासन नियमानुसार व नविन दर सुचिप्रमाणे अहवाल तयार केला होता व तो मंजुरीसाठी नगरपालिकेकडे सादर केला होता. त्या अहवालाच्या कामाची देयकाची रक्कम अदा करण्याबाबत दिनांक ११.१०.२०१८ रोजी देयकाच्या तपशिलासह पत्र सादर केले होते व त्या रकमेची मागणी केली होती. सदर पत्रावर संबंधीत कार्यालयाच्या लिपीकाची पत्र प्राप्त झाल्याबाबत सही आहे. सदर प्रतीस **नि.क्र.३६** देण्यात येते.

११. आमच्या भागीदारी फर्म मार्फत मुख्याधिकारी नगरपरिषद, राहाता यांना राहाता नगरपरिषद हद्दीमधील रस्ते प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्यातील प्रचलित शासन नियमानुसार सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तांत्रीक मंजुरीसाठी नगरपालिकेकडे दिनांक १३.०५.२०१९ रोजी सादर केला होता. सदर पत्रावर संबंधीत कार्यालयाच्या लिपीकाची पत्र प्राप्त झाल्याबाबत सही आहे. सदर प्रतीस **नि.क्र.३७** देण्यात येते.

१२. आमच्या भागीदारी फर्म मार्फत मुख्याधिकारी नगरपरिषद, राहाता यांना राहाता नगरपरिषद हद्दीमधील रस्ते प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्यातील प्रचलित शासन नियमानुसार सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल हा सुचनेअनुसार काही दुरुस्त्या करुन फेर सादर करुन तांत्रीक मंजुरीसाठी नगरपालिकेकडे दिनांक २०.०७.२०१९ रोजी सादर केला होता. सदर पत्रावर संबंधीत कार्यालयाच्या लिपीकाची पत्र प्राप्त झाल्याबाबत सही आहे. सदर प्रतीस **नि.क्र.३८** देण्यात येते.

१३. आमच्या भागीदारी फर्म मार्फत दिनांक २०.०७.२०१९ रोजी सादर केलेला शेवटचा अहवाल तांत्रीक दृष्टया तपासुन नाशिकच्या मुख्य अभियंता यांनी मंजुर केला आणि तद्नंतर तो अहवाल निधी प्राप्त होण्याकरीता संबंधीत कार्यालयाने नगरपरिषद संचालनालय कार्यालय, मुंबई यांच्याकडे दिनांक ०६.०८.२०२० रोजी सादर केला होता. दिनांक ०६.०८.२०२० रोजीच्या पत्राची स्थळप्रत पाठपुरावा करण्याकामी आमच्या फर्मला देण्यात आली होती. ती स्थळप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.३९** देण्यात येते.

१४. नगरपरिषद, राहाता यांनी रस्ता प्रकल्पाच्या कामाकरीता निधी प्राप्त करुन घेणेबाबत पाठपुरावा केला नाही, त्यामुळे त्यांना तो निधी उपलब्ध झाला नाही. आजअखेर तो प्रस्ताव तसाच प्रलंबित आहे. त्यामुळे आम्ही सदर रस्ता प्रकल्पाच्या अनुषंगाने तांत्रीक मान्यता मिळेपर्यंत जी काही प्रक्रिया पार पाडली व कामकाज केले त्या कामकाजाचा मोबदला कराराप्रमाणे रक्कम रुपये ५२,१२,५७५/- याची मागणी करणारी कायदेशिर नोटीस फर्मचे विधिज्ञ श्री. सुधीर देशमुख यांच्यामार्फत मुख्याधिकारी नगरपरिषद यांना पाठविली. त्या नोटीसची स्थळप्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर आमच्या विधिज्ञांची व भागीदारी फर्मचे भागीदार रामचंद्र भरमु पाटील यांची सही आहे. सदर दोघांच्या सहया मी ओळखतो. त्या नोटीसीमधील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४०** देण्यात येते. भागीदारी फर्म मार्फत पाठविलेली कायदेशिर मागणी नोटीस नोंदणीकृत पोस्टाने पाठविली होती, त्याची पोहोच पावती अभिलेखावर दाखल केली आहे आणि त्यावर कार्यालयातील संबंधीत लिपीकाची सही आहे. त्या पावतीस **नि.क्र.४१** देण्यात येते.

१५. आमच्या भागीदारी फर्ममार्फत सामनेवाला यांच्यासोबत झालेल्या व्यवहाराच्या तडजोडीकरीता तो विषय जिल्हा विधी सेवा केंद्र, अहमदनगर येथील कार्यालयात आम्ही सादर केला होता व त्या कार्यालयाने वादाबाबतचा सारांश असणारी माहिती प्राप्त झालेबाबत पोहोच दिली होती. त्याची स्थळप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्या प्रतीवर फर्मचे भागीदार संपतराव भिमराव पाटील यांची सही आहे. त्यांची सही मी ओळखतो. सदर सारांश माहिती अर्जास **नि.क्र.४२** देण्यात येते. जिल्हा विधी सेवा केंद्र, अहमदनगर न्यायालय येथुन आम्हाला फार्म नं.३ चा दावा दाखल होण्यापुर्वी मध्यस्थीचा प्रयत्न अयशस्वी झालेबाबत नॉनस्टार्टर रिपोर्ट दिला होता. त्याची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.४३** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. जे. ए. जोशी यांच्यामार्फत -**

१६. प्रतिवादी यांच्यामार्फत कोणी प्रतिनिधी हजर नाही. प्रतिवादींचे विधिज्ञ श्रीमती. वारुळे हजर. श्रीमती. वारुळे यांनी विधिज्ञ श्री. जोशी हे इतर न्यायालयीन कामात व्यस्त असल्याचे सांगितले आणि प्रस्तुत प्रकरणात पुढील मुदत देण्यात यावी, अशी तोंडी विनंती केली. तसेच प्रस्तुत प्रकरण उलटतपासाकरीता दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी बोर्डावर नेमण्यात यावे, अशी विनंती केली व त्या विनंतीस वादी यांचे विधिज्ञ श्री. देशमुख यांनी हरकत घेतली नाही. सबब, दोघांच्या संमतीने उलटतपाकरीता दिनांक १३.०८.२०२५ रोजीची तारीख नेमण्यात आली. परिणामी, उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकती

SAIFUDDIN BASHABHAI SHAIKH

Digitally signed by SAIFUDDIN BASHABHAI SHAIKH
Date: 2025.07.02 17:30:12 +0530

दिनांक – ०२.०७.२०२५.
राहाता.

(सैफुद्दीन बा. शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
राहाता.